| | |
|---|---|
| दाखल तारीख | २६/०७/२०१७ |
| नोंदणी तारीख | २६/०७/२०१७ |
| निर्णय तारीख | १७/०३/२०२६ |
| कालावधी | ०८ व., ०७ म., दि.२८. |
| **CNR No. MHGA050002802017** | |

भाग – अ
(न्यायनिर्णयाची शीर्षक पान)
[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (१)]

| | |
|---|---|
| | **निशाणी क्र.२६** |
| **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज यांचे न्यायालयात.** (पिठासीन अधिकारी – सतिश गो. गोरे) | |
| **अपराध क्रमांक व पोलीस स्टेशनचा तपशील** | **अपराध क्र.१६७/२०१७,** पोलीस स्टेशन, देसाईगंज. |
| **न्यायनिर्णयाचा दिनांक** | १७/०३/२०२६ |
| **प्रकरण क्रमांक** | **नियमित फौजदारी खटला क्रमांक २५/२०१७** |
| **अभियोग पक्ष :** | **महाराष्ट्र शासन** तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी, देसाईगंज, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली. (शंकर गोविंदा बेदरे) |
| **अभियोग पक्षातर्फे अधिवक्ता** | **श्री. आर.डब्ल्यु. सकीनलावार,** वि.सहा.सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी :** | **सलमान शब्बीरखॉ पठाण,** **वय** – २२ वर्ष, **धंदा** – मजुरी, **रा.** गवर्धा, **ता.** अर्जुनी मोरगांव, **जि.** गोंदिया. |

| | |
|---|---|
| आरोपीतर्फे अधिवक्ता : | श्री. डी.डब्ल्यु.पिलारे, |

**भाग – ब**

[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (२)]

| | |
|---|---|
| घटनेचा दिनांक : | १९/१०/२०१६ |
| एफ.आय.आर. दिनांक : | २०/१०/२०१६ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक : | २६/०७/२०१७ |
| दोषारोप निश्चितीचा दिनांक : | १८/११/२०१७ |
| पुराव्यास सुरुवात झाल्याचा दिनांक : | १२/१२/२०१७ |
| निकालाकरिता ठेवल्याचा दिनांक : | १२/०३/२०२६ |
| निकाल दिनांक : | १७/०३/२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास तो दिनांक : | --- |

**आरोपीचा तपशील**

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिन तारीख | दोषारोप /आरोप | दोषी / निर्दोष | शिक्षा | तुरुंगामध्ये न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सलमान शब्बीरखॉ पठाण | २७.१०.२०१६ | ०४.११.२०१६ | कलम ४५७, ३८० भा.दं.वि. | निर्दोष | नाही | २९/१०/२०१६ ते दि ०४/११/२०१६<br>१०.०२.२०२६ ते दि. १७.०३.२०२६ |

**भाग – क**

[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (३)]

**अभियोग पक्ष/ बचाव पक्ष / न्यायालयाने बोलाविलेल्या साक्षदारांची यादी**

| क्र. | नाव | साक्षदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | शंकर गोविंदाजी बेदरे (**नि.क्र.१८**) | फिर्यादी |
| अ.सा.क्र.२ | सचिन बळीराम सिडाम (**नि.क्र.१९**) | पंच साक्षदार |
| अ.सा.क्र.३ | महेश विकास नैताम (**नि.क्र.२०**) | पंच साक्षदार |

| | | |
|---|---|---|
| अ.सा.क्र.४ | लोकमान हरीजी मिसार (**नि.क्र.२१**) | साक्षदार |
| अ.सा.क्र.५ | प्रफुल तुकाराम पिल्लेवान (**नि.क्र.२२**) | पंच साक्षदार |
| अ.सा.क्र.६ | भाऊराव शितखुरा मेश्राम (**नि.क्र.२३**) | तपासी अधिकारी |

**बचावपक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षदारांची यादी**

| **अ.क्र.** | **नाव** | **साक्षेचे स्वरुप** |
|---|---|---|
| सा.क्र. १ | निरंक | निरंक |

**न्यायालयातर्फे नोंदविलेल्या साक्षदारांची यादी**

| **अ. क्र.** | **नाव** | **साक्षेचे स्वरुप** |
|---|---|---|
| सा.क्र. १ | निरंक | निरंक |

**सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **कागदपत्राचे स्वरुप** |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**बचावपक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्राची यादी**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **कागदपत्रांचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | **निरंक** | **निरंक** |

**बचावपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **कागदपत्राचे स्वरुप** |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्राची यादी**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **कागदपत्राचे स्वरुप** |
|---|---|---|
| १ | नि.क्र.पी १/पी.डब्ल्यु १ | तोंडी रिपोर्ट |
| २ | नि.क्र.पी २/पी.डब्ल्यु १ | छापील प्रथम खबर अहवाल |
| ३ | नि.क्र.पी ३/पी.डब्ल्यु २ | घटनास्थळ पंचनामा |
| ४ | नि.क्र.पी ४/पी.डब्ल्यु २ | गुन्हयाच्या तपशिलाचा नमुणा |
| ५ | नि.क्र.पी ५/पी.डब्ल्यु ६ | जप्ती पत्रक |

**मेटरीअल ऑब्जेक्ट/महत्त्वाच्या वस्तू**

| **अ. क्र.** | **मटेरिअल ऑब्जेक्ट /महत्त्वाच्या वस्तू क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

:: **न्यायनिर्णय** ::

(जाहिर दिनांक १७/०३/२०२६)

आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेचे कलम ४५७, ३८० अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या अपराधाकरिता खटला चालविण्यात आला. (यापुढे संक्षेपाकरिता भा.दं.सं. असे संबोधले आहे.)

**अभियोग पक्षाचा खटला थोडक्यात पुढीलप्रमाणे :–**

२. फिर्यादी शंकर गोविंदाजी बेदरे, रा. माता वार्ड, देसाईगंज, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली हे दि.२०.१०.२०१६ ला सकाळी १०.०० वाजता त्यांच्या आठवडी बाजार वडसा येथील अनाज धान्याच्या दुकानात गेले. तेव्हा त्यांना त्यांच्या दुकानाचा समोरचा पल्ला व साखळी कोंडा तुटुन बाहेर पडलेला दिसला. त्यांनी दुकानात जावुन पाहिले असता त्यांच्या दुकानातील २५ किलो तांदुळाचे ०६ कट्टे, गल्यातील एकुण रू ५००/– त्यांना दिसुन आले नाही. त्यामुळे त्यांनी त्यांच्या दुकानात चोरी झाल्याबाबतची तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन, देसाईगंज येथे दाखल केली.

३. सदर तोंडी रिपोर्टच्या अनुषंगाने अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेचे कलम ४६१ व ३८० अंतर्गत अपराध क्र.६३/२०१६ ची नोंद करण्यात आली. तपासी अधिकारी भाऊराव शितखुरा मेश्राम, सहा. फौज. ब.नं. २१० यांच्याकडे तपास वर्ग करण्यात आला. त्यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला. गुन्हयात चोरी गेलेले तांदुळ व मुंग आरोपी विकत असल्याचे माहिती पडल्यामुळे व आरोपीला फिर्यादीने पोलीस स्टेशनला सदर मालासह आणल्यामुळे त्यांनी आरोपीकडुन सदर माल जप्ती पत्रकाप्रमाणे जप्त केला. आरोपीला अटक

केली. साक्षदारांचे बयाण नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुद्ध भरपुर पुरावा मिळुन आल्यानंतर भा.दं.वि.चे कलम ४५७, ३८० अंतर्गत दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेचे कलम ३८०, ४५७ अंतर्गत गुन्हा केल्याचा दोषारोप **(नि.क्र.१२)** प्रमाणे ठेवला. सदर दोषारोप त्याला त्याच्या मातृभाषेत वाचून दाखविला असता त्याने सदर दोषारोप **नि.क्र.१३** प्रमाणे मान्य नसल्याचे सांगितले व त्याच्याविरुद्ध प्रकरण चालविण्याची विनंती केली.

५. माझ्या विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले व त्यावरील निर्णय मी खालील कारणमिमांसेसह नोंदविले आहे.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिद्ध करतो काय की, दि. १९/१०/२०१६ ते दि. २०/१०/२०१६ च्या दरम्यान रात्रीला मौजा देसाईगंज आठवडी बाजार, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली येथे आरोपीने फिर्यादीच्या दुकानात रात्रीच्या वेळेस कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्यासाठी चोरटे गृहअतिक्रमण केले ? | ... **नाही** |
| २. | अभियोग पक्ष सिद्ध करतो काय की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादीच्या धान्य दुकानातुन आरोपीने २५ किलो तांदळाचे कट्टे व रोख रू ५००/– फिर्यादीच्या संमतीवाचुन चोरून नेले ? | ... **नाही** |
| ३. | आदेश काय ? | **अंतीम आदेशानुसार** |

## <u>कारणमिमांसा</u>

६. आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षाद्वारे **अ.सा.क्र.१** शंकर गोविंदा बेदरे (**नि.क्र.१८**), **अ.सा.क्र.२** सचिन बळिराम सिडाम **(नि.क्र.१९), अ.सा.क्र.३** महेश विकास नैताम **(नि.क्र.२०), अ.सा.क्र.४** लोकमान हरीजी मिसार **(नि.क्र.२१),** प्रफुल तुकाराम पिल्लेवान **(नि.क्र.२२)** व भाऊराव शितखुरा मेश्राम **(नि.क्र.२३)** यांची साक्ष नोंदविली. अभियोग पक्षाने पुरसिस **(नि.क्र.२४)** दाखल करून सरकार पक्षाचा पुरावा बंद केला. आरोपीचा भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ३५१(१)(ब) अन्वयेचा जबाब **(नि.क्र.२५)** नोंदविण्यात आला. त्याचा बचाव त्याच्या विरूध्द खोटी केस दाखल केल्याचा आहे.

**<u>मुददा क्र. १ व २ करीता :-</u>**

७. शंकर **(अ.सा.क्र.१)** फिर्यादी यांच्या साक्षेत असे आले की, वर्ष २०१६ च्या १० व्या महिण्यात ते सकाळी त्यांचे तांदुळ मार्केट, देसाईगंज येथील तांदुळ ठेवलेला पाटयांचा ठेला उघडायला गेले होते, तेव्हा त्यांच्या दुकानाचे कुलुप तुटलेले व तांदुळ पडलेले त्यांना दिसले. त्यांनी पल्ले खोलुन बघितले असता त्यांच्या दुकानातील ०६ कट्टे तांदुळ, गल्यातील चिल्लर पैसे, मुंग, दाळ चोरून नेल्याचे त्यांना दिसले. त्यांनी त्याबाबतची तक्रार **(नि.क्र.पी१/पी.डब्ल्यु.१)** दाखल केली व त्यानुसार छापील प्रथम खबर अहवाल **(नि.क्र. पी२/पी.डब्ल्यु.१)** नोंदविण्यात आली. त्यांनी चोरी झाल्याबाबतची माहिती इतर व्यापारांना सुध्दा दिली. घटनेच्या दुस-या दिवशी तांदुळ व्यापारी अजय अग्रवाल यांनी त्यांना फोन करून त्यांच्या दुकानात एक इसम तांदुळ व मुंग विकायला आल्याचे व चौकशी करण्याकरीता या, असे त्यांना सांगीतले. ते दुपारी १२.०० वाजताच्या सुमारास अजय अग्रवाल यांच्या

दुकानात गेले असता आरोपी तिथे हजर होता व तिथे असलेले मुंग व तांदुळ त्यांच्या दुकानातील होते. त्यांनी आरोपीला पकडुन पोलीसांच्या स्वाधीन केले. सदर साक्षदाराने उलटतपासात मान्य केले की, अजय अग्रवाल यांच्या दुकानात बरेच लोक राशन कार्डवर मिळालेले धान्य विकण्याकरीता न्यायचे.

८. सचिन **(अ.सा.क्र.२)** पंच साक्षदार यांच्या साक्षेत असे आले की, पोलीसांनी त्याच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा व गुन्हयाच्या तपशिलाचा नमुणा अनुक्रमे **(नि.क्र.पी ३/पी.डल्यु.२ व पी ४/पी.डब्ल्यु.२)** फिर्यादीच्या दुकानात चोरी झाल्यासंदर्भात तयार केला होता. त्याच्या सहया पोलीसांनी पोलीस स्टेशन येथे घेतल्या होत्या. त्याने उलटतपासात मान्य केले की, पोलीस स्टेशन येथे सहया करतांना ते कागदपत्र त्यांनी वाचुन पाहिले नव्हते व त्याला वाचुन दाखविले नव्हते, त्यामुळे त्यातील मजकुर काय होता, हे त्याला माहित नव्हते.

९. महेश **(अ.सा.क्र.३)** यांनी सुध्दा त्याच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा व गुन्हयाच्या तपशिलाचा नमुणा पोलीसांनी तयार केल्याचे सांगीतले, परंतु उलटतपासात घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर त्याला माहित नसल्याचे सांगीतले.

१०. लोकमान **(अ.सा.क्र.४)** याच्या कथनानुसार दि. २७.१०.२०१६ ला फिर्यादी व फिर्यादीसोबत असलेले इतर लोक आरोपीला पकडुन पोलीस स्टेशनला नेत होते, ऐवढेच सांगीतले. प्रफुल **(अ.सा.क्र.५)** फितुर झालेला आहे. त्याने त्याच्या समक्ष पोलीसांनी काहीही जप्त केले नव्हते, असे सांगीतले. त्याची सही कागदावर घेतल्याचे सांगीतले.

**११.** मेश्राम **(अ.सा.क्र.६)** तपासी अधिकारी यांच्या साक्षेत असे आले की, त्यांनी तपास डायरी प्राप्त झाल्यानंतर फिर्यादीने त्यांना चोरी झालेला ठेला दाखविला होता व त्यांनी त्याबाबतचा घटनास्थळ पंचनामा **(नि.क्र.पी ३/पी.डब्ल्यु.२)** तयार केला होता. त्याच्या आठ ते पंधरा दिवसानंतर फिर्यादीने आरोपीला २५ किलो तांदुळ व ०५ किलो मुंगासह पोलीस स्टेशनला आणले होते व त्याने आरोपीजवळील सदर माल जप्ती पत्रक **(नि.क्र. पी ५/पी.डब्ल्यु.६)** प्रमाणे जप्त केला होता.

**१२.** अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, फिर्यादीने त्याच्या दुकानातुन ०६ कट्टे तांदुळ, चिल्लर पैसे व मुंग चोरी गेल्यामुळे तक्रार दिली होती, असे सांगीतले आहे. तक्रार ही अज्ञात आरोपीविरूध्द दाखल असल्याचे नमुद आहे. त्याच्या कथनानुसार घटनेच्या दुस–या दिवशी आरोपी अजय अग्रवाल याच्या दुकानात तांदुळ व मुंग विकत होता असे त्याला माहिती पडले होते व त्याने त्या दुकानात जावुन पाहिले असता तिथे असलेला तांदुळ व मुंग त्याच्या दुकानातील होते, असे सांगीतले आहे. फिर्यादीला अजय अग्रवाल याच्या दुकानात दिसलेला तांदुळ व मुंग हे त्याच्याच दुकानातील होते हे त्याने कशावरून ओळखले याबाबत त्याने काहीही सांगीतलेले नाही. सर्व तांदुळ व मुंग हे दिसायला सारखेच असतात, अशापरीस्थीतीत फिर्यादीने अजय अग्रवाल यांच्या दुकानात आरोपीने आणलेले तांदुळ व मुंग हे त्याच्या दुकानातीलच होते हे कशाच्या आधारावर ओळखले होते, याबाबत त्याने काहीही सांगीतलेले नाही. जेव्हा की फिर्यादीने त्याच्या उलटतपासात अजय अग्रवाल याच्या दुकानात बरेच लोक राशन कार्डवर मिळालेले धान्य विकण्याकरीता न्यायचे, ही बाब मान्य केलेली आहे. अशापरिस्थीतीत आरोपीचा फिर्यादीच्या

दुकानात झालेल्या चोरीसोबत संबंध होता, ही बाब सिध्द होत नाही. आरोपीला चोरी करतांना कोणी बघितले होते, याबाबत कोणत्याही साक्षदाराने सांगीतलेले नाही.

**१३.** अ.सा.क्र.२ सचिन व अ.सा.क्र.३ महेश हे सुध्दा घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षदार नाही. त्यांची साक्ष घटनास्थळ पंचनामा व गुन्हयाच्या तपशिलाचा नमुणा तयार करण्यापुरती मर्यादीत स्वरूपाची आहे. त्यांनी जरी आरोपीला ओळखत होतो, असे सांगीतले असले तरी ते आरोपीला कसे ओळखतात याबाबत त्यांनी काहीही सांगीतलेले नाही. त्यामुळे त्यांच्या साक्षेव्दारे सुध्दा आरोपीचा चोरीशी संबंध होता, हे सिध्द होत नाही. अ.सा.क्र.४ लोकमान यांनी सुध्दा आरोपीला फिर्यादी पोलीस स्टेशन येथे घेवुन जात होता, ऐवढेच सांगीतलेले आहे. जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षदार अ.सा.क्र.५ फितुर झालेला आहे.

**१४.** अ.सा.क्र.६ तपासी अधिकारी यांची साक्ष घटनास्थळ पंचनामा व जप्ती पत्रक तयार करण्यापुरती मर्यादीत स्वरूपाची आहे. सदर साक्षदाराच्या कथनानुसार घटनास्थळ पंचनामा तयार झाल्याच्या ०८ ते १५ दिवसानंतर त्याने जप्ती पत्रकाप्रमाणे नमुद असलेला माल फिर्यादीने जेव्हा आरोपीला पोलीस स्टेशन येथे पकडुन आणले होते तेव्हा पोलीस स्टेशन येथे तयार केल्याचे सांगीतले आहे. जेव्हा की फिर्यादीने घटनेच्या दुस–या दिवशीच आरोपीला पोलीस स्टेशनला पकडुन नेल्याचे सांगीतले आहे. त्यामुळे फिर्यादी व तपासी अधिकारी यांच्या साक्षेत आरोपीला पोलीस स्टेशनला आणल्याबाबतच्या दिनांकामध्ये तफावत दिसुन येते. तपासी अधिका–याच्या साक्षेत त्याने आरोपीचा निवेदन पंचनामा नोंदविला होता व त्याप्रमाणे तपास केला होता, याबाबत सुध्दा काहीही सांगीतलेले नाही.

जप्त केलेला मुद्देमाल २५ किलो तांदुळ व ०५ किलो मुंग फिर्यादीच्या दुकानातीलच होता, याबाबत कोणताही सबळ पुरावा अभीलेखावर आलेला नाही. फिर्यादमध्ये मुंग चोरी गेल्याबाबत नमुद नाही. फिर्यादीच्या दुकानातुन चोरी झालेला तांदुळ कोणत्या प्रजातीचा होता व जप्त केलेला तांदुळ कोणत्या प्रजातीचा होता, याबाबत कोणत्याही साक्षदाराच्या साक्षेत काहीही आलेले नाही. अशापरिस्थीतीत जप्त मुद्देमाल तांदुळ व मुंग हे फिर्यादीच्या दुकानातील होते, असे फिर्यादीचे कथन विश्वसनिय वाटत नाही व तसा कोणताही पुरावा अभीलेखावर आलेला नाही.

**१५.** एकंदरीत अभिलेखावर आलेल्या पुराव्यानुसार फिर्यादीच्या दुकानात तांदुळ व रोख रकमेची चोरी झाली होती हे अभियोग पक्षाने सिध्द केलेले आहे, परंतु सदर चोरी आरोपीने केली होती व जप्त मुद्देमाल तांदुळ व मुंग ही फिर्यादीच्या दुकानातुन चोरी झालेल्या मालापैकीच होती व त्या मुद्देमालाची आरोपीनेच चोरी केली होती, या बाबी अभियोग पक्ष सबळ पुराव्याव्दारे सिध्द करू शकला नाही. सबब, आरोपीविरुद्ध भा.दं.सं.चे कलम ३८०, ४५७ प्रमाणे गुन्हा सिद्ध करणारा कोणताही सबळ पुरावा अभियोग पक्ष अभिलेखावर आणू शकला नाही, असे मत नोंदवून मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.३ करीता :–</u>**

**१६.** मुद्दा क्र.१ व २ च्या नकारार्थी निर्णयावरुन आरोपी सदर प्रकरणातून दोषमुक्त सुटण्यास पात्र आहे. जप्त १५ किलो तांदुळ व ०५ किलो मुंग आधीच योग्य त्या सुप्रतदारास देण्यात आलेले आहे, त्यामुळे त्या सुप्रतनाम्याच्या अटि व शर्ती अपिल कालावधीनंतर

शिथील करणे योग्य होईल. आरोपी दि.१०.०२.२०२६ पासुन जामीनाचे उल्लंघन केल्यामुळे न्यायालयीन बंदी आहे, त्यामुळे त्याची इतर गुन्हयात आवश्यकता नसल्यास त्याला तत्पर मुक्त करणे योग्य होईल. म्हणून मी मुद्दा क्र.३ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

१. आरोपीला भारतीय दंड संहितेचे कलम ४५७, ३८० नुसार शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७१(१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपी न्यायालयीन बंदी असल्यामुळे त्याचा जात मुचलका व बंधपत्र आधीच रद्द करण्यात आले आहे.

३. आरोपी न्यायालयीन बंदी असल्यामुळे त्यांची इतर गुन्हयात आवश्यकता नसल्यास त्याला तत्पर मुक्त करण्यात यावे.

४. जप्त मुद्देमालाबाबत झालेल्या सुप्रतनाम्याच्या अटि व शर्ती अपील कालावधीनंतर शिथील करण्यात याव्या.

५. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहितचे कलम ४८१(१) च्या पुर्ततेकरीता रू.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व जात मुचलके दयावे.

६. सदर न्यायनिर्णयाची प्रत भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४०६ च्या पूर्ततेकरिता जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे पाठविण्यात यावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

Digitally signed by SATISH GOPALRAO GORE
Date: 2026.03.17 18:00:26 +0530

दिनांक : १७/०३/२०२६.

**(सतिश गोपालराव गोरे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज.
JO CODE- MH02902